# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक :-विकाअ/शिक्षण/समुपदेशन फेरी/२०१५/2749

दिनांक - 4 NOV 2015

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्था,

अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- समुपदेशन फेरीमधील प्रवेशित विद्यार्थ्यांची रक्कम मिळाली नसल्याबाबत.**

**संदर्भ :-** मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक १०/पदविका/एआरसी/समुपदेशन फेरी/२०१५/११९८ दि. २६/१०/२०१५.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, संचालनालयामार्फत पदविका अभ्यासक्रमाची केंद्रिभुत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेमध्ये समुपदेशन फेरी (कौन्सिलिंग राऊंड) घेण्यात येते. सदर फेरीसाठी प्रत्येक विद्यार्थ्याकडून राजिस्ट्रेशन फी (non-refundable) म्हणुन रक्कम रु. ३०००/- घेण्यात येते व सदर रक्कम विद्यार्थी ज्या संस्थेत (केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेत समावेश असलेल्या) प्रवेश निश्चित करतात, अशा संस्थाना सदर रक्कम विद्यार्थ्याच्या शैक्षणिक शुल्कामध्ये समायोजन करण्यासाठी परत केली जाते व त्या विद्यार्थ्यांनी समुपदेशन फेरीमध्ये अलाटमेन्ट झालेल्या संस्थेत प्रवेश निश्चित केला नाही, अशा विद्यार्थ्यांची रक्कम या संचालनालयास जमा करण्यात येते. परंतू समुपदेशन फेरीमधील केंद्राकडून आजपावेतो शैक्षणिक वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ पर्यंतची समुपदेशन फेरीसाठी उमेदवारांकडून प्रत्येकी रक्कम रु. ३०००/- प्रमाणे आकारण्यात आलेले अंतरिम शुल्क ज्या संस्थेत विद्यार्थ्यांने प्रवेश निश्चित केलेला आहे अशा काही संस्थांना देय असलेली रक्कम प्राप्त झाले नसल्यास त्याबाबत सविस्तर माहिती या कार्यालयास कळवावे, अन्यथा विद्यार्थ्यांचे काही नुकसान झाल्यास आपली संस्था सर्वस्वी जबाबदार राहाल, याची नोंद घ्यावी.

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण

अमरावती.

**प्रत :-१)** प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती यांना संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सर्व समुपदेशन फेरीमधील केन्द्रांना केन्द्रिभूत प्रवेश प्रक्रिया सुरु झाल्यापासुन या संचालनालयाच्या सबंधीत वर्षातील आदेशानुसार आजपावेतो समुपदेशन फेरीसाठी उमेदवारांकडून प्रत्येकी रक्कम रु. ३०००/- प्रमाणे आकारण्यात आलेले अंतरिम शुल्क संबंधीत संस्थांना देय असलेली रक्कम अदा केली नसल्यास संबंधीत वर्षातील आदेशानुसार रक्कम तात्काळ अदा करण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा वर्षनिहाय अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.